हडपसर पोलीस, ठाणे पुणे शहर कडील रेकॉर्डवरील गुन्हेगार नामे पंकज ऊर्फ पंक्या गोरख वाघमारे, वय २३ वर्षे रा. आल्हाटवस्ती कॅनलजवळ गाडीतळ हडपसर पुणे, यास मा. पोलीस आयुक्त पुणे शहर यांनी त्याचेकडील स्थानबध्द आदेश क्रमांक पीसीबी/डीईटी/३६०३/२०१७ दि. ३०/१२/२०१७ अन्वये महाराष्ट्र झोपडपट्टीदादा, हातभट्टीवाले, औषधी द्रव्यविषयक गुन्हेगार व धोकादायक व्यक्ती व दृक्श्राव्य, कलाकृतीची विना परवाना प्रदर्शन करणारे व्यक्ती ( व्हिडीओ पायरेटस ) यांच्या विघातक कृत्यास आळा घालण्याबाबत अधिनियम,सन १९८१ ( १९८१ सालचा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक रोमन ५५ ) (दुरूस्ती २००९) अन्वये ( **एमपीडीए** ) कायद्यान्वये दि. ३१/१२/२०१७ रोजी येरवडा मध्यवर्ती कारागृह येरवडा पुणे येथे एक वर्षाकरिता स्थानबध्द करण्यात आले आहे. सदरची कारवाई ही मा. रविंद्र सेनगांवकर अपर पोलीस आयुक्त उत्तर प्रादेशिक विभाग, पुणे मा. दिपक साकोरे पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ ४ पुणे त्तसेच मा. मिलींद पाटील सहा पोलीस आयुक्त सो, वानवडी विभाग पुणे यांचे मार्गदर्शनानुसार करण्यात आली आहे.

त्याचेविरूध्द हडपसर पोलीस ठाणे येथे खालीलप्रमाणे शरिराविरूध्दचे गुन्हे दाखल असुन त्याच्या गुन्हेगारी कृत्यास आळा बसावा म्हणुन त्यास एक वर्षाकरिता स्थानबध्द करण्यात आले आहे.

१) हडपसर पोलीस ठाणे गु.रजि.नं. ८७०/१६ भादवि क ३२६,३४
२) हडपसर पोलीस ठाणे गु.रजि.नं ३९१/१६ भादवि क ३२४,३४
३) हडपसर पोलीस ठाणे अदखलपात्र गु.रजि. नं.२४७९/१५ भादवि क ३२३,५०४
४) हडपसर पोलीस ठाणे गु.रजि.नं २१/१६ भादवि क ३२४,३२३,राईट
५) **वानवडी** पोलीस ठाणे गु.रजि.नं. २८८/१६ भादवि क ३२६, मु.पो.ॲ.कलम ३७ (१),१३५
६) हडपसर पोलीस ठाणे गु.रजि.नं ८६१/१७ भादवि ३२६,३२३, ५०४,३४
७) हडपसर पोलीस ठाणे गु.रजि.नं ९६१/१७ भादविक ३२४,५०४,५०६,१४३,१४७,१४८,१४९
८) हडपसर पोलीस ठाणे गु.रजि.नं १११११/१७ भादवि १४३,१४८,१४९,४२७,५०६ मु.पो.ॲ.क.३७
(१),१३५